International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मेखलातीर्थ मेहकर
## (मेहकर या शहराचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक शिल्पवैभव)

**प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथ पितळे**
*इतिहास विभाग प्रमुख आणि असोसिएट प्रोफेसर स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालय, रिसोड*
*Corresponding Author – प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथ पितळे*
**DOI - 10.5281/zenodo.18709664**

आधुनिक जागतिकीकरणाच्या रेटयामुळे हजारो वर्षांपासून जपलेली पारंपारिक सामाजिक, सांस्कृतिक, मानवी मूल्ये लयाला जाताना दिसत आहेत. वास्तविकत: 'कृण्वन्तो विश्वमार्यं' या भाषेत जागतिकीकरणाची पहिली हाक भारतानेच जगाला दिली होती. हजारो वर्षांच्या गुलामगिरीचा मानसिक परिणाम इतका सखोल रुजला गेला की, पश्चिमेकडून आलेले सर्व काही उत्कृष्ट असते आणि म्हणून ते स्वीकारार्ह असतेच ही भावना काही केल्या कमी होत नाही. सातत्याने हजारो वर्षांच्या वावटळीमध्येसुद्धा भारत जो निश्चल उभा राहिला, त्याचे मूळ कारण म्हणजे भारताची धार्मिक, सांस्कृतिक बैठक पक्की असणे हे होते. त्यातही मंदिरांमुळे धर्म टिकून राहिला. मंदिरे आणि त्या अनुषंगाने तीर्थस्थाने हे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय गतिविधिचे केंद्रस्थान होते. विविध कला, प्रथा - पद्धतींना त्यांचाच आश्रय होता. सामाजिक स्थैर्य आणि सामाजिक अभिसरण तीर्थक्षेत्रांमुळे शक्य झाले. प्रतिकूल काळातही लढण्यासाठी, किमान टिकून राहण्यासाठी आवश्यक असणारे धैर्य मंदिरे व तीर्थक्षेत्र संस्कृतींनेच पुरवले होते. कुंभमेळे हे एकत्रीकरणासाठीच होते. भक्तीप्राधान्यतेवर आधारित विविध पंथ आणि संप्रदाय तीर्थक्षेत्रांच्या आधारानेच वाढलेले आहेत. भारताने आपल्या आत्मिक बलासह समाज, संस्कृती, धर्म व अन्य अद्वितीय वैशिष्ट्यांचे जतन केले पाहिजे. त्यासाठी पूर्वी वैभवशाली असलेल्या, पण कालौघात आपला परिचय हरवलेल्या तीर्थक्षेत्रांचा पुनर्विकास घडवून, स्थानिक इतिहास पुनरुज्जीवित करावा लागेल. स्थानिक आवाज म्हणजेच कंठ मोकळा करावा लागेल. यासाठी स्थानिक इतिहास नव्याने पुढे आणावा लागेल. त्याद्वारे आत्मभान जागृत होऊन, वैश्विक स्तरावर भारत आपल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी युक्त होऊन पुढे येईल. या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकरचा सांस्कृतिक इतिहास मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत.



मेहकर हे गाव बुलढाणा जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून नागपूर – छत्रपती संभाजीनगर महामार्गावर आहे नागपूरपासून सुमारे चारशे किलोमीटर, छत्रपती संभाजीनगरपासून 160 किलोमीटर, लोणार पासून 22 किलोमीटर आणि शेगाव पासून 80 किलोमीटर आहे. मेहकर हे प्राचीन काळापासून वैभवसंपन्न तीर्थक्षेत्र आणि व्यापारीपेठ होते. मेहकर हे प्राचीन काळातील वास्तू आणि शिल्प यांच्या बाबतीत समृद्ध आहे. ही नगरी वाकाटक कालापासून वैभव संपन्न होती. भारताच्या प्राचीन इतिहासाची साक्ष देणाऱ्या येथील वास्तू व शिल्पे हा प्राचीन भारताच्या इतिहासाकरता अमूल्य ठेवा आहे. येथील नरसिंह, त्रिविक्रम शारंगधर, केशवराज, जनार्दन या मूर्ती शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहेत. गुप्त - वाकाटकांच्या **लोणार - मेहकर - वत्सगुल्म या सुवर्णत्रिकोणात हे गाव येते.** वाकाटकांच्या साम्राज्यात समाविष्ट असल्याने आणि वत्सगुल्म या राजधानीच्या ठिकाणाच्या परिघात घेत असल्याने गुप्त-वाकाटक कालीन सुवर्ण युगाचा परिसस्पर्श या नगरीस झाला होता. या गतवैभवाच्या खुणा वास्तू आणि शिल्परूपात येथे आपल्या संपन्नतेची साक्ष देतात. आजही भूगर्भात गडप झालेल्या मूर्ती आणि मंदिरे अचानकपणे प्रगट होऊन आपल्या वैभवाच्या खाणाखुणा सांगतात. यांपैकी जगातील अकरापैकी सहावे असलेले श्रीनरसिंह, श्री त्रिविक्रम शारंगधर बालाजी, केशवराज आणि जनार्दन विष्णू या मूर्ती आणि मढ नावाची वास्तू व नृसिंह मूर्ती सापडली ते तळघर (भुयार) अभ्यासकांसाठी उपलब्ध आहे.या ठिकाणी भूगर्भात आणखी पुष्कळ वास्तू आणि शिल्पे सापडू शकतात. येथे पर्यटकांचा राबता असल्याने हे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित होत आहे. पर्यटक आणि संशोधकांना हे क्षेत्र खुणावत आहे.




जसे लोणार हे विरजतीर्थ किंवा लवणारतीर्थ म्हणून प्रसिद्ध होते.[१] तसे मेहकर हे मेखलातीर्थ म्हणून प्रसिद्ध होते. मेहकरचे आरंभीचे नाव महंकावती असे होते. येथील डोंगर, नदी, जमीन यांची भौगोलिक रचना ॐ च्या आकाराची आहे. ॐकावती म्हणजेच महंकावती, नंतर मेघंकर आणि आता मेहकर असा अपभ्रंश या गावाचा झालेला आहे. मेहकर हे स्थान "तीर्थक्षेत्र" या संकल्पनेला अभिप्रेत सर्व लक्षणांनी युक्त आहे. पद्मपुराण तसेच गीता महात्म्यामध्ये वर्णिलेलं "मेखलातीर्थ" म्हणजे ही मेहकर ही नगरी आहे.[२] मत्स्यपुराणाच्या २२व्या अध्यायात मेघंकर नगरीचा उल्लेख आहे.[३] पंढरपूर येथील ८४ च्या शिलालेखात मेघंकर शहराची नोंद आहे. कल्याणीचा चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्या गणेशवाडी शिलालेखात (इ. स. ११९९) या स्थानाची नोंद आहे विक्रमादित्यचा महाप्रधान भीमसेन यांनी केलेल्या धर्मकृत्यांची प्रशंसा या लेखात केलेली आहे. मेहकर येथील एका जैनमूर्तीच्या पादपीठावर शके १२७२ चा लेख प्रकाशित आहे. या स्थानाचे अस्तित्व यादव पूर्व काळापासून असल्याचे स्पष्ट होते.[४] मेहकर आणि लोणार यांचा सांस्कृतिक सहसंबंध आहे. जगाचे नाभीस्थान मानल्या गेलेल्या या स्थानी पुराणपावन पैनगंगा नदी, जगातील अकरापैकी सहावे असलेले क्षेत्रदैवत श्री नरसिंह,

ग्रामदैवत श्री शारंगधर बालाजी, भगवान श्रीरामाद्वारे स्थापित ओलांडेश्वर महादेव या दैवतांसह श्री चक्रधर, संत मंगळनाथ, संत बाळाभाऊ महाराज पितळे आणि संत जगदीश बाबा यांच्या वास्तव्याने पुनित हे स्थान आपल्या जुन्या वैभवाच्या पुनर्प्राप्तीच्या प्रतीक्षेत आहे. प्रणितामातेची स्वच्छता, घाटबांधणी आणि भक्तांना परिसरात सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करणे ही या शहराची मागणी आहे.

**पतितपावनी प्रणितामाता (पैनगंगा नदी):**

मेखलातीर्थ या स्थानमहात्म्यानुसार बुधनेश्वर येथे उगम पावून बल्लारपूरला संगम पावणारी प्रणिता म्हणजेच पैनगंगा ही नदी जगातील सर्वात प्राचीन नदी मानली जाते. ब्रह्मदेवाच्या यज्ञप्रसंगी यज्ञाच्या भांड्यातून म्हणजे प्रणितापात्रातून ही नदी उगम पावली म्हणून तिला प्रणिता असे नाव मिळाले त्याचा अपभ्रंश पैनगंगा असा झाला. या नदीच्या एकूण प्रवाह लांबीपैकी मेहकर येथे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मेहकर हे शहर नैसर्गिक ओंकाराचा आकार धारण केलेल्या टेकड्यांवर वसलेले आहे. मेहकरला ही नदी उर्ध्वगामिनी झालेली आहे. एखादी नदी ज्या स्थानी उलट दिशेने म्हणजे उगमाच्या दिशेने वाहत असेल तर तेंव्हा तिला "ऊर्ध्वगामिनी" म्हटले जाते. पैनगंगा ही नदी पूर्ववाहिनी आहे. मेहकरला एक किलोमीटर लांबीच्या भागात ती पश्चिमवाहिनी झालेली आहे. अशा स्थानी केलेली साधना आणि कर्म अनंतपटीने फलंदायी होते अशी मान्यता असल्याने या स्थानास सांस्कृतिक विश्वात महत्त्व आहे. तीर्थ वेगळे असते, क्षेत्र वेगळे असते आणि तीर्थक्षेत्र ही वेगळी संकल्पना आहे. तीर्थक्षेत्र या शब्दाची संकल्पना अशी आहे की तिथे ऊर्ध्वगामिनी नदी असावी, कृपाळू अशी दैवते असावी आणि सिद्ध अशा संतांचे वास्तव्य असावे. तीर्थक्षेत्राच्या या निकषांमध्ये बसणारे संपूर्ण महाराष्ट्रात पंढरपूर, पैठण, आळंदी, नाशिक आणि मेहकर अशी मोजकी स्थाने आहेत. जसे पंढरपूरला श्री विठ्ठल दैवत आणि भक्त पुंडलिक हे संत आहेत तसे मेहकरला श्री नरसिंह हे क्षेत्रदैवत आणि श्रीशारंगधर बालाजी हे ग्रामदैवत आहे. संत बाळाभाऊ महाराज पितळे हे संत झालेले आहेत, म्हणून हे क्षेत्र तीर्थक्षेत्र आहे अशा स्थानी पिंडदानाला फार महत्त्व आहे. या ठिकाणी त्रेतायुगात अयोध्या नरेश भगवान श्रीरामाने स्वहस्ते पिंडदान केल्याची आख्यायिका येथे सांगितली जाते.[५]

**प्रणितातीरावरील दैवते:**



**जगातील अकरापैकी सहावे नृसिंस्थान:**

मेहकर येथे उपलब्ध शिल्पांपैकी नृसिंहमूर्ती ही सर्वात प्राचीन आहे. मेहकरचे क्षेत्रदैवत असलेले आणि येथील सर्वात प्राचीन असलेले हे नरसिंहस्थान जगातील प्रमुख अकरांपैकी सहावे स्थान मानले जाते. श्री नरसिंहाच्या अवतारानंतर भक्त प्रल्हाद आणि लक्ष्मीमाता यांची भेट येथे प्रथमत: झाली होती. येथेच श्रीनृसिंहाने आपले उग्ररूप टाकून भोजन केले होते अशी येथील महती आहे.[६] सध्या विराजमान असलेली मूर्ती उत्तर चालुक्य कालीन आहे. म्हणजे इ.स.आठव्या ते नवव्या शतकातील आहे. ही मूर्ती सौंदर्य पाचव्या किंवा सहाव्या शतकातील असावे असे डॉ. किरण देशमुख यांचे मत आहे.[७] देऊळगावराजा येथील बालाजीची मूर्ती ज्या देवशर्मा नामक ब्राह्मणास सापडली होती, तो देऊळगावराजा येथे जाण्यापूर्वी मेहकर येथील नरसिंह मंदिरात मुक्कामी होता. तिथे त्याला स्वप्न पडून नरसिंहाने राजूरच्या गणपतीचे दर्शन घेऊन, देऊळगावराजाला जाऊन, मूर्तीचा शोध घेण्यास सांगितले होते असे तेथील स्थानमहात्म्यामध्ये आहे. ही घटना शिवपूर्व काळातील होती, म्हणजे तेंव्हासुद्धा हे मंदिर प्रसिद्ध होते. [८] मूर्तीशास्त्राचा उत्कृष्ट नमुना असणारी ही अष्टभुजा मूर्ती अशा प्रकारची जगातील एकमेव मूर्ती आहे. ही मूर्ती सर्वांग सुंदर आणि विलक्षण आकर्षक आहे. मूर्तीशास्त्रातील संकल्पना आणि प्रमाणबद्धतेचा पुरेपूर वापर यामध्ये केलेला आहे. सौंदर्य आणि मोहकता यामध्ये ठासून भरलेली आहे. गंडकी शीळेतील या मूर्तीवर अलंकार कोरलेले आहेत. या मूर्तीसाठी प्राचीन काळात भव्य मंदिर असावे. अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरीवरील पहिली स्वारी इ. स. १२९६ मध्ये याभागातून झाली होती. त्यावेळी ही मूर्ती गडबडीने जमिनीखाली दोन खोल्यांचे हेमाडपंती तळघर बांधून त्यात लपवण्यात आली होती. नंतर ही मूर्ती इ. स. १५६९ मध्ये संत बाळाभाऊ महाराज पितळे यांच्या पूर्वजांना भूगर्भात सापडली. येथे वर्षभर भाविकांची व पर्यटकांची रीघ असते. वर्षभरात चार मोठे उत्सव होतात. यांपैकी वैशाख महिन्यातील नृसिंह जन्मोत्सव भारतभरात अद्वितीय असतो. नऊ दिवस मूर्तीस वारदेवतांचे पोषाख दिले जातात, आणि शेवटच्या दिवशी नाट्यमय पद्धतीने पडदा उघडून आतील उग्ररूपातील, दागिन्यांनी मढवलेली, धुरातून हळूहळू स्पष्ट होणारी नृसिंहमूर्ती पाहणे रोमांचक ठरते. हे जगातील ११ पैकी सहावे नृसिंहस्थान आहे अशी येथील भाविकांची श्रद्धा असल्याने येथे हजारो पर्यटकांची भेट वर्षभरात होत असते.

**मूर्तीचे वर्णन:**



मूर्तीचे स्थानक ( म्हणजे उभी), आसन (म्हणजे बसलेली) आणि शयन (म्हणजे झोपलेली) असे तीन प्रकार असतात. याशिवाय योग, भोग, वीर, अभिचारक असेही काही प्रकार आहेत. ही मूर्ती आसन, तामस आणि विदरण प्रकारातील आहे. उग्र आणि सौम्य या दोन्ही प्रकारांचे मिश्रण असणे आणि हातात तलवार असणे हे या मूर्तीचे वैशिष्ट्य आहे. ही मूर्ती अष्टभुजा असून खालचे दोन हात हिरण्यकश्यपू या राक्षसाचे पोट फाडताना दाखवलेले आहेत. तलवार, चक्र, शंख पद्म, गदा ही आयुधे धारण केलेली आहेत. एक हात आशीर्वाद मुद्रेत आहे. आणि दुसरा हात कर्तरी मुद्रेत आहे. डोक्यावर भौमितिक नक्षीकाम असलेला करंडक मुकुट आहे. हातावरच्या रेषा आणि बोटांचा नखरेलपणा सुंदर आहे. शरीरावर सर्वत्र नक्षीकाम आहे हातापायांमध्ये बाजूबंद, कंकण, अंगठ्या, नुपूर, तोडे अप्रतिम कोरलेले आहेत. डोळे मोठे आणि बाहेर आलेले असून खाली पाहणारे व रागावलेले आहेत. गळ्याभोवती सुंदर आयाळ आहे. नाक आणि कान सिंहाला शोभणारे आहे. नाभी कटी कृष आहे. गळ्यात जाणवे नाही. मांडीवर हिरण्यकश्यपू आडवा धरलेला आहे. त्याच्या अंगावर भरपूर नक्षीकाम आहे. नृसिंहाचा पाय सव्य ललितासनात म्हणजे डावा पाय जमिनीवर किंचित ठेवलेला असून उजव्या पायाच्या गुडघ्यामागील बेचकीत राक्षसाचा पाय धरून ठेवलेला आहे. नरसिंह उंबऱ्यावर बसलेला दाखवलेला आहे. जबडा दाखवलेला आहे. तोंडात दोन दातांची सुळे दिसतात. जीभ वरच्या टाळूला टिकवलेली आहे. कपाळावर तिसरा नेत्र उंचवट्याच्या रूपात आहे. आखीव रेखीव कलाकृतीमुळे मूर्ती भव्य, रेखीव आणि आकर्षक आहे. हिरण्यकश्यपूची हनवटी गदेच्या खालच्या टोकाने आणि मांडी तलवारीच्या टोकाने दाबून धरलेली आहे. कलाकाराने जीव ओतून मूर्ती तयार केलेली आहे.[९] या मूर्तीच्या कालखंडाबाबत दोन मते प्रचलित आहेत मूर्तीच्या बनावटीची काही लक्षणे उत्तर चालुक्य शैलीतील आहेत. तर दुसऱ्या मतानुसार हे वाकाटक कालीन आहे.(वाकाटकांनी रामटेकला म्हणजे त्यांच्या नंदीवर्धन राजधानीच्या परिसरात नरसिंह मंदिर उभारले होते. तसेच नंतर वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेने मेहकरला नरसिंह मंदिर उभारले असावे.)

**त्रिविक्रम शारंगधर बालाजी:**



मेहकरला सर्वांगसुंदर, विलक्षण आकर्षक अशी त्रिविक्रम विष्णू मूर्ती आहे. या मूर्तीला स्थानिक लोक शारंगधर आणि बालाजी नावाने संबोधतात. यादवकालीन ही मूर्ती इ.स. १८८८ मध्ये भूगर्भात सापडली. अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापूर्वी या मूर्तीसाठी मंदिर असले पाहिजे. ही मूर्ती सापडल्यावर हीला ब्रिटिश अधिकाऱ्यांनी इंग्लंडला नेण्याचा घाट घातला होता पण स्थानिक लोकांनी आंदोलन केले, काहींनी जेल भोगले, काहींनी पोलिसांचा मार खाऊन ही मूर्ती वाचवली पण मूर्ती सोबत सापडलेली तीन ताम्रपत्रे मात्र इंग्लंडला गेली. ही मूर्ती गंडकी पाषाणाची, भव्य अशी अकरा फूट उंच आहे. हात चतुर्भुज आहेत. उजव्या

खालच्या हातात पद्म, उजव्या वरच्या हातात गदा, डाव्या वरच्या हातात चक्र आणि डाव्या खालच्या हातात शंख असा आयुधांचा क्रम आहे. गदा उलटी धरून जमिनीवर टेकवलेली आहे. मुठीवर अलगद हळुवारपणे बोटे टेकवलेली आहेत. सुदर्शन चक्र दोन तळहाताच्या परीघाएवढे मोठे आहे. शंख उभा धरलेला आहे. डोक्यावर करंडक मुकुट आहे. त्यात शारंग नामक धनुर्धारी पुरुषाची बसलेली छोटी मूर्ती कोरलेली आहे. मुकुटावर शिखर नसून सपाट पृष्ठभाग आहे. मूर्ती खाली व आग्रपट्ट्यावर एकूण पाच कीर्तीमुख कोरलेले आहेत. मूर्तीस पाठशिळा नाही. भोवताली प्रभावळ आहे. त्यात दशावतार मूर्ती कोरलेल्या आहेत. यात आठवा अवतार कृष्णाऐवजी बलराम दाखवलेला आहे. मुकुटाच्या दोन्ही बाजूंनी अप्सरा आहेत, त्या विमानात उभ्या असल्याचा भास होतो. कपाळ विस्तीर्ण आहे. चेहऱ्यावर विलक्षण रमणीय,आश्वासक स्मितहास्य आहे. डोळे कमळाच्या पानांच्या आकाराचे आणि अर्धोन्मिलीत आहेत. कानात गोल कर्णकुंडले आहेत. गळ्याला खेटून छोटा रत्नजडीत, जाडसर हार आणि पोटापर्यंत रुळणारी माळ आहे. जानवे ठळक आहे. छातीवर श्रीवत्स दिसते. पोट समप्रमाणात आहे. अंगावर उत्तरीय नाही. पोटरीपर्यंत रूळणारी वनमाला आहे. पायात जाडसर तोडे आहेत. दोन्ही पायांमधून वस्त्रांचा सोगा पुढे आलेला आहे. नेसावयाचे वस्त्र म्हणून अलंकृत जंघिका आहे म्हणजे मांडीइतके धोतर आहे. (अर्धोरूक) यावर काय बंधन किंवा कटिसूत्र आहे. हे वस्त्र अलंकृत माळांनी गुंफलेले आहे.समपाय असून ते एक दीड इंच नक्षीदार कमल आकारातील पादपिठावर आहे. डाव्या बाजूला लक्ष्मीची मूर्ती एक ते दीड फूट उंच आहे.या मूर्तीचा एक पाय टोंगळ्यात वाकवलेला आहे. यातही करंडक मुकुट आणि भरपूर अलंकरण आहे.उजवीकडे मांडी घालून खाली बसलेली स्त्री मूर्ती आहे. तिच्या डोक्यावर मुकुट नाही पण अलंकरण भरपूर आहे. पायांजवळ शंखपुरुष आणि चक्रपुरुष आहे, त्यांच्याही अंगावर भरपूर अलंकार आहे.[१०] येथे वर्षभर भक्तांचा राबता असतो. भव्य मंदिर, अन्नछत्र, परिवार देवतांची मंदिरे येथे आहेत. परिसरातील केशवराज, गरुड मूर्ती विलक्षण विलोभनीय आहे. येथे मार्गशीर्ष महिन्यात पंधरा दिवसांचा मोठा उत्सव होतो. याशिवाय वर्षभरात अनेक सण, उत्सव, यात्रा, पालखी, मिरवणूक संपन्न होत असल्याने त्या निमित्ताने आणि मूर्तीचे दर्शनासाठी हजारो भाविक आणि पर्यटक येत असतात.[११]

**ओलांडेश्वर मंदिर** :



पिंडदानासाठी प्रसिद्ध असलेल्या पैनगंगेच्या पात्रात भगवान श्रीरामाने आपल्या राज्याभिषेकानंतर येथे येऊन स्वहस्ते आपले पिता दशरथ यांच्यासाठी पिंडदान केले होते, त्यावेळी स्थापन केलेले लिंग म्हणजे आजचे ओलांडेश्वर

मंदिर आहे असे मानले जाते. जिथे पैनगंगा नदी उर्ध्वगामिनी बनते, नेमक्या त्या स्थानी नदीपात्रात ही पिंड आहे. या स्मशानवासी महादेवापासून हे तीर्थक्षेत्र सुरू होते तर स्मशानापाशीच या क्षेत्राचा शेवट होतो मध्यंतरी विष्णूमूर्तींची ही नदी पूजा करते. मानवी जीवनाचा शेवट स्मशानातच आहे हे लक्षात ठेवून अखंड सत्कर्म करीत असावे असा संदेश यातून दिल्या गेलेला आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार अलीकडेच म्हणजे इ.स. १९९० मध्ये अवलिया संत जगदीश बाबा यांनी केला आहे. त्यांची समाधी लगतच आहे

**श्री दत्तमठ** - पैनगंगेच्या काठावर १८ व्या शतकातील एक विस्तीर्ण दत्तमठ आहे. येथे प्राप्त शिलालेखानुसार या मठाचे बांधकाम इ. स. १७२६ मध्ये पूर्ण झाले होते. या मठाची रचना मराठेकालीन स्थापत्य पद्धतीनुसार आहे. एकूण एक एकर परिसरातील मुख्य मंदिर ४०*२५ चे आहे. तळघरासह दोन मजली श्रीहरि ऋषि यांच्या समाधीची इमारत असून त्यावर 70 फूट उंच कळस आहे. येथे भुयारी मार्गही आहे.

**मढ (धर्मशाळा)** :



नदीपात्रात ओलांडेश्वर मंदिराजवळ मढ नावाची वास्तू आहे. ही १२ व्या शतकातील रचना आहे. हे पिंडदानासाठीचे स्थान होते.किंवा एखादे मंदिर असावे. सध्या हे स्थान केंद्रीय पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे.[१२]

**नरसिंह भुयार** - पैनगंगा काठावर माळीपेठेत गोपाळकृष्ण मंदिर आणि नरसिंह भुयार आहे. परकीय आक्रमण काळात नरसिंह मूर्ती येथील हेमाडपंती बांधणीच्या भूगर्भातील दोन खोल्यांमध्ये ठेवण्यात आली होती. १००० वर्ष जुनी ही ऐतिहासिक वास्तू आजही यथास्थिती आहे.

**कंचनीचा महाल-**



मेहकरला मुघल काळातील म्हणजे पंधराव्या शतकातील एक वास्तू गावालगत उभी आहे. कंचनीचा महाल अशी ओळख असणारी ही वास्तू समाज आणि शासन यांच्या दुर्लक्षामुळे शेवटच्या घटका मोजत आहे. विटांपासून निर्मित ही वास्तू लोकवदंताची विषयवस्तू झालेली आहे. ही वास्तू मध्ययुगीन स्त्रियांची स्थिती, सामाजिक विषमता यांवर प्रकाशझोत टाकते. या वास्तूतील स्त्री दगड बनली होती असे म्हणतात म्हणजे परिस्थितीपुढे हतबल होऊन उदास, विषण्ण होऊन तिचे मन मेले होते म्हणजेच पाषाणासारखी ती बनली होती असा याचा अर्थ होतो. तिला लोणारच्या मंदिराचा दिवा बघायचा होता याचा अर्थ दिवा म्हणजे ज्ञान किंवा कीर्ती. लोणार आणि मेहकर परिसराचा अमूल्य ऐतिहासिक वारसा जपणे, येथील वास्तू व शिल्प वैभव पुन्हा दिमाखाने उभे करून संवर्धित करणे आणि वारसा जपणे असा दिवा या शब्दाचा अर्थ होतो. गावातील प्रस्थापितांच्या मंदिरापेक्षा एका कंचनीचा महाल उंच असणे हे प्रस्थापितांच्या कसा पचनी पडणार? हे मारुती चित्तमपल्ली यांचे उद्गार तत्कालीन सामाजिक विषमतेवर जळजळीत प्रकाश टाकतात. कविवर्य ना. घ. देशपांडे यांनी या वास्तूचे मनोगत ओळखून कंचनीचा महाल हे दीर्घकाव्य लिहिले. एखाद्या स्थानिक राजा किंवा अधिकाऱ्याने त्याच्या आवडत्या कंचनीसाठी बांधलेला हा महाल होता. सध्या हा दोन मजली असून भग्नावस्थेत आहे. पूर्वी हा महाल ७ मजली होता असे जुने लोक सांगतात. ही वास्तु दुर्लक्ष, भग्नावस्था आणि अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलेली आहे. तातडीने लक्ष न दिल्यास पुढील पाच वर्षांनी या महालाचे नामोनिशान उरणार नाही.[१३]

**रेणुका माता मंदिर:** पैनगंगेच्या काठावर सुमारे २०० वर्ष जुने रेणुका देवीचे मंदिर आहे. माहूरच्या रेणुकेचा तांदळा शेंदूर लावून मोठ्या आकाराचा झालेला आहे. सडक रस्त्यावरून सुमारे दोन वाजले खोल हे मंदिर आहे. अगस्ती नावाच्या परिवाराने या मंदिराचे संगोपन अनेक पिढ्यांपासून केलेले आहे.

**मेहकरमधील संत आणि मठ:**

**महानुभाव मठ** - १२ व्या शतकातील महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर यांचे वास्तव्य मेहकरला दहा महिने होते.येथील बाणेश्वर मंदिरात वास्तव्य करून त्यांनी अनेक लीला केलेल्या आहेत. स्थानपोथी आणि लीळाचरित्रात याबाबत माहिती मिळते. नुकतेच येथे नदीपात्रात प्राचीन शिवमंदिराचे अवशेष सापडलेले आहेत.[१४]

**संत बाळाभाऊ महाराज पितळे (श्वासानंद सरस्वती) यांचा श्रीक्षेत्र ज्ञानमंदिर मठ:**





आदिशक्ती मुक्ताईच्या परंपरेतील संत बाळाभाऊ महाराज पितळे (श्वासानंद सरस्वती) हे विदर्भातील पहिले वारकरी संत होते. त्यांच्या परंपरेतील देशभरातील भक्तांची संख्या लाखावर आहे. त्यांची समाधी वाराणसी येथे आहे. त्यांची गुरुगादी असणारा मुख्य मठ ज्ञानमंदिर नावाने येथे आहे. संत बाळाभाऊ महाराज पितळे यांनी नरसिंह संस्थानच्या नित्य आणि नैमित्तिक उत्सवांसाठी जमणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी लोकवर्गणीतून बांधलेली, त्यांची गुरुगादी असणारा हा मुख्य मठ मध्ययुगीन स्थापत्यशास्त्राचा नमुना आहे. ही वास्तू आता ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची बनलेली आहे. नरसिंह संस्थानचा हा मठ मराठेकालीन माळवदी रचनेचा परंतु त्यात लाकडाऐवजी लोखंडी तुळया आणि लोखंडी खांब वापरलेले आहे. येथे छोटेखानी वस्तूसंग्रहालय आहे. अशाप्रकारची ही रचना फार दुर्मिळ आहे म्हणून येथे भक्तांची आणि इतिहासाच्या अभ्यासकांची नेहमी रीघ असते. ५००० स्क्वे. फुटांचा दुमजली भव्य मठ या परिसराचे भूषण आहे. या मठाच्या लोखंडी पायऱ्या मेहकरची ओळख आहे. उत्सवादि उपक्रम येथे राबवले जातात.[१५]

**नवनिर्मित वास्तू :**

**गायत्री माता मंदिर -** मथुरा येथील पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या युग निर्माण योजनेच्या गायत्री परिवाराचे केंद्र म्हणून गायत्री माता मंदिराची स्थापना इ.स.२०१० मध्ये करण्यात आली आहे. येथे वर्षभर यज्ञयागादि उपक्रम राबविले जातात.

**विश्वकर्मा मंदिर -** कुशल कारागिरांची देवता असलेल्या भगवान विश्वकर्मा मंदिराची स्थापना स्थानिक सुतार समाजा द्वारे इ. स. २०१२ मध्ये करण्यात आली. इथे विश्वकर्माची संगमरवरी मूर्ती आहे.

याशिवाय प्रणिता काठावर मुक्ताई मंदिर आणि दोन मारुती मंदिरे आहेत. यातील एका मंदिरावर वैशिष्ट्यपूर्ण लोखंडी छत्रीचे छत आहे. याशिवाय येथे संत मंगळनाथ, संत जगदीश बाबा यांची समाधी मंदिरे आहेत.

**समालोचन:**

दीड ते दोन हजार वर्षांच्या परंपरेचा अभिमान बाळगणारे मेहकर हे गाव पैनगंगेच्या आधाराने वसलेले आहे. अनेक दैवते, संत- महंत, मठ- पिठांच्या परंपरा या नदीच्या आश्रयाने वाढलेल्या आणि बहरलेल्या आहेत. यांपैकी शारंगधर, नरसिंह आणि संत बाळाभाऊ महाराजांचा कीर्तीगंध तर राष्ट्रीय स्तरावर दळवळलेला आहे. स्थानिक मंदिरे व संस्थाने भक्तांच्या आश्रयाने येथे वर्षभर धार्मिक उत्सव आणि उपक्रम राबवीत असतात. ही सर्व मंदिरे मिळून वर्षभरात किमान दहा लाख लोकांची वर्दळ या परिसरात आहे. सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून हे स्थान विकसित होणे गरजेचे आहे. पैनगंगेच्या पात्राची स्वच्छता, खोलीकरण आणि वर्षभर जलप्रवाह राहण्यासाठी बांध किंवा कट्टा असणे गरजेचे आहे. ओलांडेश्वर मंदिर ते स्मशानभूमी एवढ्या पूर्ण भागात घाट बांधणे ही गरज आहे. या सर्व मंदिरात येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी एकत्र मोठे पार्किंग, किमान ५० संडास व बाथरूम, दवाखाना, किमान शंभर खोल्यांचे भक्तनिवास, पाणी, रस्ते, प्रकाश योजना यासह सर्व अत्यावश्यक सोयीसुविधा निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणून समाज आणि शासनाने एक व्यापक मोहीम राबवून महाराष्ट्राच्या इतिहासातील या सांस्कृतिक, ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या शहराला आपले वैभव पुन्हा मिळवून द्यावे, जेणेकरून सांस्कृतिक पर्यटन वाढवून स्थानिक जनतेला रोजगार मिळेल.

**संदर्भ:**


१. प्रा. सुरेश माघारी, ऐतिहासिक लोणार, २००७, पृ.३०
२. श्रीमद्भगवद्गीता, हरिॐ मॅन्युफॅक्चरर्स, अहमदाबाद, पृ. १८४,१८५
३. यादव माधव काळे, वऱ्हाड प्रांताचा इतिहास, पारस पब्लिकेशन, कोल्हापूर, २०२१, पृ. ३३८
४. अरुणचंद्र पाठक, स्थानपोथी : एक पुरातत्त्वीय अभ्यास (यादवकालीन महाराष्ट्र), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०१३, पृ. ४०
५. ॲड. रंगनाथ दि. पितळे, मेहकरचा नृसिंह, श्री लक्ष्मीनृसिंह प्रकाशन, २००८, पृ.३८
६. उपरोक्त, पृ.१
७. डॉ किरण देशमुख, मेहकरचे शिल्पवैभव, दै. देशोन्नती (अकोला आवृत्ती), २५ मे २०२३, पृ.४
८. श्री व्यंकटेश प्रसाद, दास श्रीधर विरचित प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ, श्री बालाजी संस्थान, देऊळगावराजा, २०१३, पृ. ३३-३४
९. डॉ श्रीहरि पितळे, मेहकरची नृसिंहमूर्ती, अवर हेरिटेज (जर्नल), ISSN- 0474-9030-, Vol.68, Issi40, Feb. 2020, P-251 to 259
१०. डॉ श्रीहरि पितळे, त्रिविक्रम विष्णु शारंगधर, मेहकर, B Aadhar(Journal) ISSN -2278-9308(CCCL VI) 356, Impact Factor - 8.575(SJII) June 2022,P-116 to 119
११. प्र के घाणेकर, श्री त्रिविक्रम विष्णूमूर्ती, स्नेहल प्रकाशन, पुणे, ७ मे २०२२, पृ.७८
१२. उपरोक्त, टीप ३, पृ. ३३९
१३. Sachin Dixit , Temples of Lonar, Aprant publication, Pune, April 2025, P-127
१४. http://youtu.be/yiTSPAAINkc?si=nj4LrkZnwsuSTNd0
१५. ॲड. रंगनाथ दि. पितळे, श्वासानंद माऊली, श्री लक्ष्मीनृसिंह प्रकाशन, २०१२